भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार )

जा.क्र. ८२७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/१२/२०१६

१) चारचाकी वाहणाच्या धडकेत मोटार सायकल चालक गंभीर जखमी. :—

दिनांक १७/१२/२०१६ रोजी ०७.३० वा. दर. यातील जखमी फिर्यादी राधेश्याम बकाराम शेंडे वय ५२ वर्ष रा. बेटाळा हा त्याचा मित्र प्रवीण शेंडे वय २८ वर्ष रा. बेटाळा याचे सोबत मोटार सायकलने सनफ्लॅग वरठी येथे कामावर जात असता समोरून येणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला खैरी शिवार येथे धडक मारून गंभीर जखमी केल्याने फिर्यादीचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

२) बोलेरो गाडीची ट्रकला धडक देवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १७/१२/२०१६ रोजी २१.१५ वा. दर. यातील फिर्यादी दिलीप विठ्ठल ऊईके वय ४२ वर्ष रा. उसरागोंदी याचा ट्रक क्र. एमएच ३६ एफ १७९४ ने खडकी रोड ने येत असता यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयीगयीने व लापरवाहीने चालवुन ट्रकला धडक मारून अंदाजे ३,०००/—रू चे नुकसान केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम २७९,४२७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

४) प्रकृती बिघडल्याने महीलेचा मृत्यु. :—

दिंनाक १६/१२/२०१६ चे १२.१० वा. दर. यातील मृतक सौ. प्रमीला बाई भजन रामटेके वय ४८ वर्ष, रा. इंदोरा पोस्टे. लाखांदुर तिची प्रकृती बरी नसल्याने तिला डॉ. जोगेवार यांचेकडे औषधउपचार घेवुन परत आली नंतर पुन्हा जास्त प्रकुती बिघडल्याने तिला ख्रिस्तानंद हॉस्पीटल ब्रम्हपुरी येथे औषधोपचारा करीता नेले असता डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने पोस्टे. ब्रम्हपुरी येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.शी. १०२५ खंडाते पो.स्टे. ब्रम्हपुरी यांचे हस्ते पो.स्टे.ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा ऊईके यांनी मर्ग दाखल केल्याने पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोयर पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहे.

४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक १७/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ८३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहनाकरीता ०२ केसेस, तिन सिटर वाहनांवरती १४ केसेस व ईतर वाहनांवरती ६७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९७६४७४११४६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.